



# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे





✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - २ रे. ✻ अंक १७५ वा. ✻ गुरूवार दि.०८ जानेवारी २०२६ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 175 ✻ Thursday 08 January 2026 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610


## लावंघर, समर्थगाव-काशीळ व भाटमरळी उपसा सिंचन योजनेच्या निविदा प्रक्रियेस शासनाची मान्यता

### ना.शिवेंद्रसिंहराजे यांच्या पाठपुराव्याला यश; सिंचन क्षेत्रात वाढ होऊन शेतकऱ्यांना होणार फायदा

सातारा - उरमोडी धरणातील पाणी सातारा तालुक्यातील लावंघर, समर्थगाव-काशीळ व भाटमरळी या उपसा सिंचन योजनेद्वारे त्या- त्या भागातील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी उपलब्ध व्हावे, यासाठी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा पाठपुरावा सुरु होता. ना. शिवेंद्रसिंहराजे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले असून उरमोडी धरणाच्या मोठा पाटबंधारे सिंचन प्रकल्पांतर्गत लावंघर, समर्थगाव- काशीळ आणि भाटमरळी या तीन उपसा सिंचन योजनेच्या निविदा प्रक्रियेस शासनाने मान्यता दिली आहे.

त्यामुळे या तिन्ही योजना आता लवकरच मार्गी लागणार असून शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सुटणार आहे. तीनही योजनांच्या निविदा प्रक्रियेला मान्यता दिल्याबद्दल ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

उरमोडी प्रकल्पांतर्गत परळी गावाजवळ कृष्णा नदीच्या उरमोडी या उपनदीवर ९.९६ टी.एम.सी. क्षमतेचे धरण सन २०१० साली बांधून पूर्ण झाले असून त्या वर्षीपासून १०० % पाणीसाठा होत आहे. उरमोडी प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालास दिनांक ०७/१२/२०२५ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत रक्कम रु. ४४१४.२८ कोटी किंमतीस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या चतुर्थ सुप्रमानुसार सातारा तालुक्यातील ९७५६ हेक्टर, खटाव तालुक्यातील ९७२५ हेक्टर व माण तालुक्यातील ९७२५ हेक्टर असे एकूण २९२०६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात येणार आहे. उरमोडी प्रकल्पाच्या सुधारीत चतुर्थ प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास १० डिसेंबर २०२५ रोजी शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. चतुर्थ सुप्रमा प्रस्तावात समाविष्ट असलेल्या लावंघर, समर्थगाव-काशीळ आणि भाटमरळी या उपसा सिंचन योजनांच्या कामाच्या निविदा प्रक्रियेस शासनाने मान्यता प्रदान केली असून त्यामुळे सातारा तालुक्यातील अतिरिक्त सिंचन क्षेत्र निर्मितीचा मार्ग सुकर झालेला आहे.

लावंघर उपसा सिंचन योजनेद्वारे सातारा तालुक्यातील लावंघर, शिंदेवाडी, म्हसकरवाडी, करंजे, करूण, अंबवडे या ६ गावांतील एकूण ३५५ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

उरमोडी- कण्हेर जोड कालव्याच्या सा क्र. ०/६०० मी येथुन १३६ मी. उंचीवर प्रस्तावित वितरण कुंडामधुन बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी देणे प्रस्तावित आहे. यासाठी २५० अश्वशक्तीच्या २ पंप (एकुण ५०० अश्व शक्ती) बसविण्यात येणार असुन बंदिस्त पाईपलाईनद्वारे सिंचन करणे प्रस्तावित आहे. या उपसा सिंचन योजनेसाठी



सुमारे रु. ३९.८१ कोटी एवढ्या खर्चाची तरतुद असुन ही उपसा सिंचन योजना मार्च-२०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या निविदा प्रक्रियेस मान्यता मिळाल्यामुळे लावंघर परिसरातील ६ - गावांतील शेतक-यांची सिंचनासाठीची प्रदिर्घ काळापासून प्रलंबित असणारी मागणी पूर्णत्वास जाणार आहे.

समर्थगांव व काशिळ उपसा सिंचन योजनेच्या कामाच्या निविदा प्रक्रियेसही शासनाने मान्यता प्रदान केली असून त्यामुळे सातारा तालुक्यातील ७२० हे. अतिरिक्त सिंचन क्षेत्र निर्मितीचा मार्ग सुकर झालेला आहे. समर्थगांव व काशिळ उपसा सिंचन योजनेसाठी रु. ५६.२६ कोटी एवढ्या खर्चाची तरतुद असुन या उपसा सिंचन योजना मार्च- २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. समर्थगाव उपसा सिंचन योजनेद्वारे सातारा तालुक्यातील समर्थगाव परिसरातील एकूण ३४५ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. खोडद बंधा-यावरून १०० मी. उंचीवर प्रस्तावित वितरण कुंडामधुन बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी देणे प्रस्तावित आहे. यासाठी २१५ अश्वशक्ती च्या २ पंप (एकुण ४३० अश्वशक्ती) बसविण्यात येणार असुन बंदिस्त पाईपलाईनद्वारे सिंचन करणे प्रस्तावित आहे.

काशिळ उपसा सिंचन योजनेद्वारे सातारा तालुक्यातील काशिळ गावांतील एकूण ३७५ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. खोडद बंधा-यावरुन येथून १११ मी. उंचीवर प्रस्तावित वितरण कुंडामधुन बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी देणे प्रस्तावित आहे. यासाठी २१५ अश्वशक्ती च्या २ पंप (एकुण ४३० अश्वशक्ती) बसविण्यात येणार असुन बंदिस्त पाईपलाईनद्वारे सिंचन करणे प्रस्तावित आहे. तसेच भाटमरळी उपसा सिंचन योजनेच्या निविदा प्रक्रियेलाही शासनाने मान्यता दिली असून यामुळे या भागातील सिंचन क्षेत्रात वाढ होऊन येथील शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. या तीनही योजनांच्या निविदा प्रक्रियेला मान्यता मिळाल्याने या भागातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून शेतकऱ्यांनी ना. शिवेंद्रसिंहराजे यांचे आभार मानले आहेत.

## नवीन नळ पाणी पुरवठा योजनेचा उद्घाटन ९ जानेवारीला

कराड : गोवारे ता.कराड येथे महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री माननीय बाळासाहेब पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून जलजीवन मिशन योजनेअंतर्गत ७ कोटी ५० लक्ष रुपयाच्या बांधण्यात आलेल्या श्री चौंडेश्वरीदेवी नळ पाणीपुरवठा योजनेचा आणि पी डी पाटीलसाहेब जलशुद्धीकरण केंद्र या कामांचा उद्घाटन समारंभ शुक्रवार दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता माजी सहकार व पणन मंत्री, सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माननीय बाळासाहेब पाटील यांचे शुभहस्ते, कराड लोकशाही आघाडीचे अध्यक्ष मा श्री जयंतकाका पाटील व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे. सदर समारंभासाठी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ यांनी गोवारे ता.कराड येथे शुक्रवार दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



## कृष्णा विश्व विद्यापीठात गुरुवारपासून 'जेम्स २०२६' आंतरराष्ट्रीय परिषद

### 'इमर्जन्सी मेडिसीन'वर होणार व्यापक चर्चा; ६ देशांतील तज्ज्ञांचे लाभणार मार्गदर्शन

कराड : येथील कृष्णा विश्व विद्यापीठ आणि अकॅडेमिक इमर्जन्सी मेडिसीन फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने कराड येथे ८ ते ११ जानेवारी या कालावधीत 'जेम्स २०२६' अर्थात ग्लोबल इमर्जन्सी मेडिसिन समिट या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेत इमर्जन्सी मेडिसीन या विषयातील ११ आंतरराष्ट्रीय आणि ४३ राष्ट्रीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार असून, सुमारे २५० प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

आपत्कालीन वैद्यक क्षेत्रातील ज्ञान, कौशल्य आणि जागतिक अनुभवांची देवाणघेवाण व्हावी, या उद्देशाने कृष्णा विश्व विद्यापीठात आयोजित करण्यात आलेली ही महाराष्ट्रातील पहिलीच आंतरराष्ट्रीय परिषद आहे. परिषदेचे औपचारिक उद्घाटन शनिवारी (ता. १०) दुपारी १२ वाजता कुलपती डॉ. सुरेश भोसले यांच्या हस्ते होणार आहे.

याप्रसंगी ऑस्ट्रेलियातील प्रा. डॉ. अन्थोनी ब्रॉवन, दक्षिण अफ्रिकेतील प्रा. डॉ. तोमोथ्य हार्डकॅस्टल, कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसच्या अधिष्ठाता डॉ. युगंतरा कदम, कृष्णा हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. विजय कणसे, परिषदेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. सुरेश डेव्हिड, कृष्णा हॉस्पिटलमधील इमर्जन्सी मेडिसीन विभागप्रमुख डॉ. शंतनु कुलकर्णी, डॉ. राहुल एस. एस., डॉ. अभिनव टी., डॉ. मारिओ न्टोनी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.

यादिवशी कृष्णा विद्यापीठातील नोटॉमी विभागातर्फे क्ले मॉडेलचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

या चार दिवसीय परिषदेत ऑस्ट्रेलिया, दक्षिण अफ्रिका, इस्रायल, नेपाळ, युनायटेड अरब एमिराट्स, युनायटेड किंग्डम आदी देशांमधील आणि भारतातील विविध राज्यांमधील नामवंत आपत्कालीन वैद्यक तज्ज्ञ उपस्थित राहून कार्यशाळा, शैक्षणिक सत्रे व प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करणार आहेत.

## मृतालाही मरण नाही! बानुगडेवाडीतील स्मशान भूमीकडे जाणारा रस्ता अतिक्रमणाच्या विळख्यात

### अंतिम संस्कारासाठी नागरिकांची फरफट, तहसीलदारांचे सोयीस्कर दुर्लक्ष

मसूर(प्रतिनिधी): बानुगडेवाडी ता. कराड येथील स्मशानभूमीकडे जाणारा एकमेव सार्वजनिक रस्ता मोठ्या प्रमाणात अतिक्रमणामुळे पूर्णतः बाधित झाला असून, मृत व्यक्तींच्या अंतिम संस्कारासाठी जाणाऱ्या नागरिकांना प्रचंड हाल सहन करावे लागत आहेत. या रस्त्यावर अतिक्रमण करून थेट ऊसाचे पीक घेतले गेले असून, त्यामुळे स्मशानभूमीकडे जाण्यासाठी मोकळा मार्गच उरलेला नाही. विशेषतः पावसाळ्यात ही परिस्थिती अधिकच भीषण बनत असून, ग्रामस्थांच्या संतप्त भावना आता उफाळून येत आहेत.

ग्रामस्थांनी याबाबत तहसीलदार कार्यालयाकडे अनेक वेळा लेखी निवेदने, तक्रारी देऊनही प्रशासनाने याकडे सोयीस्करपणे कानाडोळा केल्याचा गंभीर आरोप होत आहे. मृत्यू हा प्रत्येकाच्या आयुष्यातील अटळ सत्य असताना, त्या मृत व्यक्तीच्या अंतिम संस्कारासाठीही योग्य रस्ता उपलब्ध नसेल, ही बाब अत्यंत लाजिरवाणी व माणुसकीला काळीमा फासणारी असल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. पावसाळ्यात चिखल, पाणी आणि ऊसाच्या शेतीमुळे रस्ता पूर्णतः बंद होत असून, अनेक वेळा प्रेत वाहून नेणाऱ्या वाहनांना किंवा खांद्यावर प्रेत घेऊन जाणाऱ्या नातेवाईकांना अक्षरशः शेतातून वाट काढावी लागते. काही वेळा



प्रेत रस्त्यात अडकून राहते, तर काही वेळा पाय घसरून पडण्याच्या घटना घडत आहेत. अशा अवस्थेत प्रेतांची विटंबना होत असल्याचे विदारक चित्र बानुगडेवाडीत पाहायला मिळत आहे.

स्मशानभूमी म्हणजे श्रद्धा, शांतता आणि अंतिम विश्रांतीचे ठिकाण असते; मात्र बानुगडेवाडीची स्मशानभूमी आज 'खोळंबा नसून वानवा' अशी अवस्था झाली आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया ग्रामस्थांमधून उमटत आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे अतिक्रमणधारकांचे मनोबल वाढले असून, सार्वजनिक रस्त्यावर ऊसाचे पीक उभे राहणे ही कायद्याची थट्टाच असल्याचे बोलले जात आहे.ग्रामस्थांनी स्पष्ट शब्दांत मागणी केली आहे की, स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता तात्काळ मोकळा करून अतिक्रमण हटवण्यात यावे, तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात यावी. अन्यथा ग्रामस्थांना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

मृतांच्या अंतिम संस्कारासाठीही जर प्रशासनाला वेळ नसेल, तर जिवंत नागरिकांच्या प्रश्नांकडे कोण लक्ष देणार, असा संतप्त सवाल आता बानुगडेवाडीतील ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. प्रशासन जागे होणार की आणखी एखाद्या मृतदेहाला चिखलातून वाट काढावी लागणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## दिपालीताई समाजाच्या हितासाठी कायम प्रयत्नशील-संग्राम घोरपडे(बापू)

मसूर : गेल्या अनेक वर्षे आरफळ कॅनॉल पोटपाटाच्या बाजूकडील रस्त्याच्या दुरावस्थे मुळे शेतकरी त्रस्त झाले होते या प्रलंबित आणि दुर्लक्षित रस्त्याबाबत व शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सामाजिक कार्यकर्ते दीपालीताई खोत यांनी पुढाकार घेऊन ही बाब आमदार मनोज दादा घोरपडे व युवा नेते संग्राम घोरपडे यांच्या निदर्शनास आणून दिल्याने त्याची तात्काळ दखल घेऊन या प्रलंबित रस्त्याचा पाठपुरावा केला त्यामुळे गेली अनेक वर्षे दुर्लक्षित असलेल्या रस्त्याचा प्रश्न सुटल्यामुळे नागरिकांनी सर्वांना धन्यवाद दिले असून समाज हितासाठी सातत्याने पुढाकार घेऊन त्याचा पाठपुरावा करणाऱ्या दिपालीताई खोत या कायम प्रयत्नशील असतात असे उद्गार संग्राम घोरपडे यांनी काढले.



हणबरवाडी मायनर कॅनॉल क्रमांक १ ते निगडी पाटबंधारे विभागाच्या पोटपाटाच्या बाजूने आलेला रस्त्याचे खडीकरण मुरमीकरण काम कराड उत्तर चे लोकप्रिय आमदार मनोज घोरपडे आणि पाटबंधारे विभाग यांच्या माध्यमातून चालू झाले. कॅनॉल झाल्यापासून या रस्त्यांची डागडुजी झाली नव्हती. खड्ड्यांचे साम्राज्य झाल्याने ऊस वाहतूक व्यवस्थित होत नव्हती. रस्त्यावरील शेतकऱ्यांना खूप त्रास होत होता. गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याची मागणी प्रलंबित होती. वहिवाटीत असलेल्या शेतकऱ्यांची समस्या जाणून कराड उत्तरच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण च्या अध्यक्षा दिपालीताई खोत या काही दिवसापूर्वी संबंधित शेतकऱ्यांसह आमदार मनोज दादा यांचे बंधू कराड उत्तर युवा नेते . संग्राम घोरपडे बापू यांना भेटून विषय मांडला असताना ८ दिवसात यंत्रणा मार्गी लावू असे आश्वासन दिले होते. पुरंदर जाधव यांच्या सहकार्याने आज कामास सुरुवात झाली. हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर दळणवळण अधिक सुलभ होणार असून शेतकरी, व सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे शेतकरी वर्गातून आनंद व्यक्त होत आहे

याप्रसंगी दिपालीताई खोत अध्यक्षा मुख्यमंत्री लाडकी बहिणी योजना शासकीय समिती,पुरंदर जाधव सरचिटणीस कराड उत्तर कोपर्डे मंडल उपसरपंच वाण्याचीवाडी मधुकर खोत. पाणलोटचे अध्यक्ष अमोल उमरदंड, बाळकृष्ण उमरदंड, पांडुरंग साळुंखे, लक्ष्मण जाधव, सागर धस, मनोज चव्हाण, जितेंद्र उमरदंड, विजय धस, सुधीर जाधव, लक्ष्मण साळुंखे, बाळासाहेब उमरदंड, संभाजी धस,दादा मोरे आणि शेतकरी उपस्थित होते.

## कृष्णा पुलावर संरक्षक जाळा न बसविल्यास आमरण उपोषणाचा इशारा

कराड : कराड-विटा रस्त्यावर असलेल्या कृष्णा नदीवरील पुलावरून अनेक महिलांनी व मुलींनी उडी मारून आपले जीवन संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यावर उपाय म्हणून रक्षक प्रतिष्ठानच्या वतीने पुलावर संरक्षक जाळ्या बसविण्याची मागणी अनेकदा केली गेली आहे, मात्र अद्याप कोणतीही कामे सुरु झाली नाहीत.

सातारा जिल्हा अध्यक्ष मनोज बंडा माळी यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महिला व मुलींना पुलाच्या कठड्यावरून सहज चढता येत असल्यामुळे हा परिसर कृष्णा सुसाईड पॉईंट म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. मागील वर्षी ५ ऑगस्ट २०२५



रोजी प्रांताधिकारी कराड यांना रास्ता रोको निवेदन देऊन याकडे लक्ष वेधले गेले होते. १ जानेवारी २०२६ रोजी पुलावरून उडी मारून एका तरुणीने आपले जीवन संपवले, ज्यामुळे परिसरातील नागरिक आणि रक्षक प्रतिष्ठान यांच्यात संताप वाढला आहे. रक्षक प्रतिष्ठानाच्या मागणीवरून राष्ट्रीय महामार्ग विभागाने संरक्षक जाळ्यासाठी अंदाजपत्रक ४३ लाख रूपये तयार केले असून, खा. उदयनराजे भोसले यांनी देखील लेखी पत्राद्वारे काम सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. तरीही अद्याप कोणतीही कामे झाली नाहीत.

**मनोज माळी म्हणाले, कृष्णा पुलावर संरक्षक जाळ्या तात्काळ न बसवल्यास १३ जानेवारी २०२६ पासून तहसील कार्यालय कराड येथे आमरण उपोषण सुरु करण्यात येईल.**

# एमआयएम, काँग्रेससोबतच्या युतीमुळे भाजपची नाचक्की, अभद्र युतीमुळे मुख्यमंत्री फडणवीसही संतापले

मुंबई : एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपरिषदेत भाजपाने काँग्रेसबरोबर युती केली. तर अकोला जिल्ह्यातील अकोट मध्ये थेट एमआयएम बरोबर हातमिळवणी केल्याने भाजपावर चौफेर टीका होत आहे. या अनैसर्गिक युतीमुळे पक्षाच्या वैचारिक भूमिकेची लक्तरें निघाल्याने अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक पातळीवर झालेल्या या युतीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. ही युती तोडण्याचे आदेश देतानाच, स्थानिक पदाधिका-यांवर कारवाईचा इशाराही त्यांनी दिला. प्रदेश काँग्रेसला अंधारात ठेऊन केलेल्या या युतीची प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही गंभीर दखल घेतली असून, अंबरनाथ ब्लॉक अध्यक्ष प्रदीप पाटील यांची व नगरसेवकांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. अंबरनाथ व अकोला जिल्ह्यातील अकोट नगरपरिषदेत भाजपाने काँग्रेस व एमआयएम सोबत सत्तेसाठी आघाडी केल्याचे समोर आल्याने भाजपावर जोरदार टीका होत आहे. सत्तेसाठी भाजप कोणाबरोबरही युती करू शकतो. शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी तर भाजपाला कामाठीपुरातील वारंगणेची उपमा देताना पेजेसाठी ते कोणाचाही शेजेवर जाऊ शकतात, अशी जळजळीत टीका केली. तर एमआयएम ही भाजपचीच बी टीम आहे, त्यामुळे ही युती नवीन नसल्याची टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

# संपादकीय....

## विकासाचा आराखडा...!

राज्यातील महानगरांच्या विकासाची चर्चा करणारी असावी याला मराठी प्रसारमाध्यमांनी प्राधान्य देणे अपेक्षित होते. मात्र मराठी प्रसारमाध्यमांना त्याचे महत्त्व वाटत नसावे अशी परिस्थिती आहे. असो. मुद्दा होता तो राज्यातील महानगरांच्या भविष्यकाळातील वाढीनुसार विकास आराखडा तयार करण्याचा, पण ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात ही नेतेमंडळी कोणत्याच निवडणुकीत राज्याच्या विकासाच्या मुद्द्यावर बोलायला तयार नसतात. देवेंद्र फडणवीस हे मात्र मुंबई आणि अन्य महापालिकांच्या निवडणुकीत विकासाच्या एकमेव मुद्द्यावर बोलण्याचे धाडस दाखवितात. देवेंद्र यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीत (म्हणजे २०१४ ते २०१९) मुंबई, पुणे आणि नागपूर मेट्रोला मंजुरी मिळून हा प्रकल्प सुरूही झाला आहे. उद्धव ठाकरेंनी नेहमीप्रमाणे 'मुंबई महाराष्ट्रापासून तोडणार' हे बाल (रड) गीत सुरू केले आहे.

देवेंद्र यांनी काही महिन्यांपूर्वी विधानसभेत केलेल्या भाषणात मुंबई आणि अन्य शहरांसाठी भविष्यकालीन योजनांविषयी भाष्य केले होते. मुंबईचा तसेच मुंबईलगतच्या पुणे, नाशिक या महानगरांचाही चेहरामोहराही बदलत आहे. मुंबईत आरे-कफ परेड या भुयारी मार्गावरील मेट्रो सुरूही झाली आहे. सी-लिंकचा वर्सोवा-दहिसर-भाईंदरपर्यंत विस्तार, दहिसरकडील नवीन लिंक रोड, फ्री-फ्लो ब्रिजेस, तसेच विविध टनेल प्रकल्पांमुळे मुंबईतील वाहतूककोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल अशी आशा आहे. सध्या मुंबईतील ६० टक्के वाहतूक पश्चिम द्रुतगती मार्गावर असल्याने या क्षेत्राला पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पुढील पाच वर्षांत मेट्रोचे संपूर्ण जाळे तयार होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि वापरण्यास सोपी बनेल, सागरी सेतू आणि ट्रान्स हार्बर लिंकच्या माध्यमातून मुंबईकर तर सुसाट प्रवास करत आहेत. मुंबईतील पायाभूत सुविधा व सार्वजनिक वाहतुकींचे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईच्या कोणत्याही टोकापासून दुसऱ्या टोकाला ५९ मिनिटांत पोहोचता येणार आहे. दरवर्षी किमान ५0 किलोमीटरचे मेट्रो मार्ग तयार झाले पाहिजेत, असे उद्दिष्ट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए)ला ठरवून दिले आहे.

२०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजप-शिवसेनेचे सरकार येण्यापूर्वी राज्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार होते. त्या सरकारने राज्यात ११ किलोमीटर लांबीची पहिली मेट्रो सुरू करण्यासाठी ११ वर्षे लावली. पण जेव्हा देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री महाराष्ट्राचे नेतृत्व स्वीकारले तेव्हा त्यांनी अत्यंत कमी कालावधीत जवळपास ३३७ किलोमीटरचा प्लॅन तयार करून त्यातील काही फेजमधील मेट्रो लाइन सुरू देखील केल्या. सर्वात जलद गतीने मेट्रोची कामे मार्गी लावून त्या लोकांसाठी उपलब्ध करून देण्याचा विश्वविक्रम फडणवीस सरकारने केला आहे.

मुंबईकरांचा आणखी एक जिव्हाळ्याचा विषय म्हणजे घरांची उपलब्धता. त्यातही जुन्या घरांचा पुनर्विकास हा एक महत्त्वाचा मार्ग. भाजप महायुती सरकारने स्वयंपुनर्विकास धोरण आणून त्यातला एक महत्त्वाचा प्रश्न मार्गी लावला. वरळीतील बीडीडी चाळ पुनर्विकासातील घरांचा चावी वाटप सोहळा नुकताच संपन्न झाला आहे. शेकडो नागरिकांचे ५०० चौरस फूट घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात एकूण १२१ चाळींचा पुनर्विकास होत आहे. या प्रकल्पात ४० मजल्यांच्या अशा ३३ इमारती बांधल्या जाणार आहेत. या इमारती, टॉवर भूकंपरोधक पद्धतीने बांधण्यात आल्या आहेत.

# महाराष्ट्र सदनात जागतिक पाक संस्कृतीचा संगम

## विविध देशातील 30 दिग्गज शेफकडून राज्याच्या आदरातिथ्याचा गौरव



नवी दिल्ली : देशाच्या राजधानीतील 'महाराष्ट्र सदन' या भव्य वास्तूने आणि येथील उच्च दर्जाच्या शिष्टाचाराने जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. जगातील विविध देशांतील ३० नामांकित दिग्गज शेफच्या एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने मंगळवारी महाराष्ट्र सदनाला सदिच्छा भेट दिली. महाराष्ट्राचे वैभव आणि येथील आदरातिथ्य पाहून हे आंतरराष्ट्रीय पाहुणे अक्षरशः भारावून गेले. महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी या शिष्टमंडळाचे उत्साहात स्वागत केले. यावेळी आयोजित विशेष सोहळ्यात त्यांनी सर्व परदेशी पाहुण्यांना राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाची ओळख करून दिली.

या भेटीदरम्यान ऑस्ट्रेलिया, युक्रेन, मॅसेडोनिया, मलेशिया, मालदीव, दक्षिण आफ्रिका, सर्बिया, फिलिपिन्स, उझबेकिस्तान, श्रीलंका, मलेशिया, सिंगापूर, व्हिएतनाम, फ्रान्स, दुबई, केनिया, मॉरिशस, इंडोनेशिया, मालदीव यांसारख्या विविध देशांतील ३० पाककला तज्ज्ञांनी महाराष्ट्र सदनाच्या वास्तूशिल्पाची पाहणी केली. निवासी आयुक्त आर. विमला यांनी या प्रतिनिधींना महाराष्ट्राची विविधता आणि जागतिक स्तरावर नावाजल्या जाणाऱ्या 'महाराष्ट्रीयन खाद्यसंस्कृती'चे महत्त्व सविस्तरपणे पटवून दिले. या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे निवासी आयुक्तांच्या हस्ते सर्व पाहुण्यांना 'पारंपरिक दिवे' भेट म्हणून देऊन त्यांचा अनोखा सन्मान करण्यात आला. भारतीय संस्कृतीत प्रकाशाचे प्रतीक मानले जाणारे हे दिवे स्वीकारताना पाहुण्यांनी मनापासून आनंद व्यक्त केला.

या भेटीदरम्यान विदेशी पाहुण्यांनी महाराष्ट्राच्या अस्सल खाद्यसंस्कृतीचा अनुभव घेतला. त्यांनी श्रीखंड, पुरणपोळी, झुणका-भाकरी आणि कढी-मसालाभात यांसारख्या पारंपरिक मराठी व्यंजनांचा आस्वाद घेतला. या चविष्ट मेजवानीने जागतिक स्तरावरील हे शेफ भारावून गेले. तसेच, विदेशी पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी हिंदी गाण्यांचा एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये भारतीय संगीताच्या तालावर हे सर्व मान्यवर मनसोक्त थिरकले. निवासी आयुक्त आर. विमला आपल्या मनोगतात म्हणाल्या की, जगाच्या पाठीवरील विविध देशांतून आलेल्या कल्पक आणि प्रतिभावंत शेफचे यजमानपद भूषवणे, ही महाराष्ट्र शासनासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे. अशा भेटींमुळे केवळ खाद्यसंस्कृतीच नव्हे, तर दोन देशांमधील ऋणानुबंध अधिक दृढ होतात. या शिष्टमंडळातील सदस्यांनी महाराष्ट्र सदनातील शिष्टाचार, स्वच्छता आणि इथल्या जिव्हाळ्याच्या आदरातिथ्याबद्दल प्रशासनाचे मनःपूर्वक आभार मानले. या कार्यक्रमाला सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, महाराष्ट्र परिचय केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे आणि सदनातील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# उपनगराध्यक्ष पदासाठी शिराळ्यात मोर्चेबांधणी

## इच्छुकांची जोरदार तयारी : नेत्यांची मनधरणी




शिराळा : शिराळा नगरपंचायतमध्ये स्वीकृत सदस्य पदासाठी भाजपाकडून थोडक्यात अवघ्या चार मतांनी पराभूत झालेले वार्ड क्रमांक चारचे उमेदवार अभिजीत प्रतापराव यादव उर्फ पप्पू व प्रभाग तीन मधून राष्ट्रवादीकडून पराभूत झालेले महेश शिवाजीराव खंडागळे यांची स्वीकृत सदस्य उमेदवार म्हणून निवड झाली आहे.



येत्या शुक्रवारी नऊ जानेवारी रोजी या निवडी जाहीर होतील.उपनगराध्यक्ष पदाकरिता भाजपाचे,बसवेश्वर शेटे व रमेश कांबळे, राजसिंह पाटील या नूतन सदस्यांची मोर्चे बांधणी सुरू झाली आहे. इच्छुकांनी नेत्यांकडे धाव घेतली आहे. भाजप व शिवसेना युतीचे नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक झाल्याने बहुमत असणाऱ्या सदस्या पैकी एक उपनगराध्यक्ष पदी युतीचाच उपनगराध्यक्ष विराजमान होणार आहे. त्या दृष्टीने इच्छुकांनी जोरदार मोर्चे बांधणी व फिल्डिंग लावली आहे.

नगरपंचायतीत भाजप, शिवसेना सत्ता आली असून आता उपनगराध्यक्ष कोण होणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. येथे ११ नगरसेवक भाजप व शिवसेना गटाचे, तर ६ नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. भाजप, शिवसेना गटाकडे उपनगराध्यक्ष पद जाणार आहे. भाजपा-शिवसेना गटाकडून बसवेश्वर शेटे ,रमेश कांबळे तसेच राजसिंग पाटील यांची नावे चर्चेत आली आहेत. उपनगराध्यक्षपदा शिवाय इतर समित्यावर सभापती म्हणून कोणाला संधी मिळणार याची चर्चा सुरू आहे. तसेच निवडून आलेल्या नवनिर्वाचित महिलां पैकी कोणाला संधी मिळणार का? याकडे लक्ष लागले आहे.

# शिराळ्यातील अपघातात वाकुर्डे खुर्दचा तरुण ठार



शिराळा (प्रतिनिधी) :मंगळवारी रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास शिराळा येथील शिराळा वाकुर्डे रोड च्या रसिका मंगल कार्यालयासमोर भरधाव वेगाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवत असलेला मांगले येथील तरुण मयूर प्रकाश बामणे स्प्लेंडर (एम एच १० इ पी ४५७६) मोटरसायकलने जोराची धडक दिल्याने गंभीर जखमी झालेले वाकुर्डे खुर्द येथील तरुण एम मोटरसायकल क्रमांक एम एच १४यु ७८१६ वरील सुधीर जालिंदर कांबळे वय वर्षे ३६ हा ठार झाला आहेत. घटनेची नोंद शिराळा पोलीस ठाण्यात आले असून तपास पोलीस निरीक्षक जंबाजी भोसले व पोलीस हेड कॉन्स्टेबल ठोंबरे करीत आहेत.

# इराणमधील तणावपूर्ण स्थिती भारताने जारी केली ट्रॅव्हल डव्हायजरी

नवी दिल्ली : इराणमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या संघर्षामुळे परिस्थिती अधिकच तणावपूर्ण बनली आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारने सद्या इराणमध्ये असलेल्या आणि तिकडे प्रवासास जाण्याचा विचार करणाऱ्या आपल्या नागरिकांसाठी अधिकृत प्रवास मार्गदर्शक सूचना (ट्रॅव्हल डव्हायजरी) जारी केली आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, इराणमधील सद्यस्थिती पाहता भारतीय नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत इराणचा कोणताही बिगर-जरुरी (Non-essential) प्रवास टाळावा. जे भारतीय नागरिक कामानिमित्त किंवा शिक्षणासाठी सध्या इराणमध्ये वास्तव्य करत आहेत, त्यांनी अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः ज्या भागात हिंसक आंदोलने किंवा मोठी गर्दी जमली आहे, अशा ठिकाणांपासून भारतीयांनी लांब राहावे, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

भारत सरकारने इराणमधील भारतीयांना स्थानिक बातम्या आणि घडामोडींवर सतत लक्ष ठेवण्यास सांगितले आहे. तसेच, तेहरानमधील भारतीय दूतावासाच्या अधिकृत वेबसाइट आणि सोशल मीडिया खात्यांच्या संपर्कात राहून वेळोवेळी जारी होणाऱ्या सूचनांचे पालन करण्यास सांगण्यात आले आहे. जे भारतीय नागरिक निवासी व्हिसावर तिथे राहत आहेत आणि ज्यांनी अद्याप दूतावासाकडे आपली नोंदणी केलेली नाही, त्यांनी तातडीने आपली माहिती नोंदवावी, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत त्यांच्यापर्यंत मदत पोहोचवणे सोपे होईल. इराणमध्ये गेल्या आठवडाभरात सरकारविरोधी आंदोलनांनी पेट घेतला असून, आंदोलक आणि सुरक्षा दलांमधील चकमकी वाढल्या आहेत. या अनिश्चिततेच्या वातावरणामुळे भारतीय नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी केंद्र सरकारने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

# अलिबाग बुरूमखान-वर्सोली खून प्रकरणी आरोपीस आठ वर्षे सक्तमजुरी

## रायगड जिल्हा न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**(याकूब सय्यद)**

रायगड : अलिबाग तालुक्यातील बुरूमखान-वर्सोली येथील आदिवासी वाडी परिसरात घडलेल्या खून प्रकरणी रायगड जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी अरुण (उर्फ राहुल) उदय वाघमारे यास दोषी ठरवून भारतीय दंड संहिता कलम ३०४ (२) अंतर्गत आठ वर्षे सक्तमजुरी व पाच हजार रुपयांचा द्रव्यदंड अशी शिक्षा ठोठावली आहे. या प्रकरणात फिर्यादी अर्चना अजय वाघमारे यांच्या तक्रारीनुसार, त्यांच्या सासरे संतोष बाळू वाघमारे व आरोपी यांच्यात शाब्दिक वाद होऊन भांडणास सुरुवात झाली होती. हे भांडण सोडविण्यासाठी फिर्यादी यांचे पती अजय संतोष वाघमारे तेथे गेले असता आरोपीने अजय वाघमारे यांचा गळा दोन्ही हातांनी पकडून त्यांना जमिनीवर पाडले. त्यानंतर त्यांच्या अंगावर बसून गळा जोरात आवळत पोट व छातीवर गुडघ्याने वार करून अजय वाघमारे यांचा जीव घेतल्याचे न्यायालयासमोर सिद्ध झाले. या घटनेनंतर फिर्यादी अर्चना वाघमारे यांनी अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती.




सदर गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. बी. बी. हर्णे व सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सचिन कुलकर्णी (अलिबाग पोलीस ठाणे) यांनी जलद गतीने व प्रभावीपणे पूर्ण केला.

या खटल्यात शासकीय अभियोक्ता ॲड. संतोष सखाराम पवार यांनी १२ साक्षीदार तपासून सशक्त व प्रभावी युक्तिवाद केला. त्यामध्ये फिर्यादीची साक्ष तसेच अलिबाग पोलीस ठाण्यातील तपासी अधिकाऱ्यांची साक्ष रायगड जिल्हा व सत्र न्यायालयासाठी निर्णायक ठरली. खटल्याच्या यशस्वी पैरवीसाठी पोलीस हवालदार क्र. २१४४ सचिन खैरनार, पोलीस हवालदार क्र. २३५२ प्रवीण पाटील तसेच पोलीस उपनिरीक्षक श्री. सुनील डोंगे (पैरवी अधिकारी) यांचे सहकार्य मोलाचे ठरले.

# बालमहोत्सवातून मुला-मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना-जिल्हाधिकारी अशोक काकडे

## तीन दिवसीय जिल्हास्तरीय चाचा नेहरु बाल महोत्सव दिमाखात सुरू

सांगली : कोणत्याही स्पर्धेत यश मिळणे किंवा न मिळणे ही गौण गोष्ट आहे, परंतु त्यामध्ये उत्साहाने सहभागी होणे सर्वात महत्त्वाचे असते. चाचा नेहरू बाल महोत्सवात सर्व विद्यार्थ्यांनी आपला सर्वोत्तम कामगिरी करावी आणि इतरांसमोर आदर्श ठेवावा, जेणेकरून इतर मुलेही त्यातून प्रेरणा घेऊ शकतील. या बाल महोत्सवामुळे मुला-मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना मिळेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी आज येथे केले.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, सांगली यांचेमार्फत शासकीय / स्वयंसेवी संस्था व शाळांमधील बालकांसाठी कै. दादू काका भिडे व सौ. सुंदरबाई मालू मुलींचे बालगृह निरीक्षण गृह सांगली येथे आयोजित जिल्हास्तरीय चाचा नेहरु बाल महोत्सव सन २०२५-२६ चे उद्घाटन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी बाल न्याय मंडळाच्या अध्यक्ष प्रमुख न्यायदंडाधिकारी प्रियांका करवंदे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी वर्षा पाटील, जिल्हा माहिती अधिकारी संप्रदा बीडकर, जिल्हा परिवीक्षा अधिकारी सुरेंद्र बेंद्रे, जिल्हा संरक्षण अधिकारी संजय चौगुले, अधिक्षक अमर भोसले, बाल कल्याण समिती अध्यक्ष निवेदिता ढाकणे, बाल न्याय मंडळाच्या सदस्य डॉ. जयश्री पाटील, डॉ. उदय जगदाळे, तुशाल शिवशरण आदि उपस्थित होते.



मुलांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या व्यासपीठाचे कौतुक करून जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, चाचा नेहरू बाल महोत्सव ७ ते ९ जानेवारी २०२६ असा तीन दिवस चालणार आहे. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून आनंद घ्यावा. मुलांच्या आनंदासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बालविकास विभागाने केलेल्या या प्रयत्नांचे त्यांनी विशेष आभार मानले.

प्रारंभी जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी विविध संस्थेतील विद्यार्थ्यांनी केलेल्या पथसंचलनाची पाहणी केली. त्यानंतर मान्यवरांनी गणित व रोबोटिक प्रदर्शनास भेट देऊन माहिती जाणून घेऊन मुलांनी सादर केलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. दीप प्रज्वलन व आकाशात फुगे सोडून या बाल महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बाल कल्याण समितीचे व बाल न्याय मंडळाचे सदस्य, संस्था अधीक्षक, कर्मचारी, कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी, तालुका संरक्षण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा चाईल्ड लाईन यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. तीन दिवस चालणाऱ्या या बाल महोत्सवात क्रीडांगणावरील सांघिक खेळ कबड्डी, खो-खो, क्रिकेट, रिले, बौध्दिक खेळ कॅरम, बुध्दिबळ, चित्रकला, निबंध, वक्तृत्व स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम सामूहिक गायन, सामूहिक नृत्य अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. ❋ संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# शिराळे खुर्द शाळेचे तालुकास्तरीय स्पर्धेत सुयश, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड



शिराळा : शिराळे खुर्द येथील जिल्हा परिषद शाळा शिराळे खुर्द या शाळेतील विद्यार्थी विहान मारुती पाटील याने ५० मीटर धावणे स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवला तर लांब उडीमध्ये द्वितीय क्रमांक मिळवून दुहेरी सुयश संपादन केले. विहानची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

त्याचप्रमाणे शाळेने सांघिक गटामध्ये रिले ५० मीटर मुले या गटामध्ये तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला. यामध्ये विहान पाटील संस्कार पाटील प्रीतम नाईक आदित्य सुतार या विद्यार्थ्यांचा समावेश होता. सदर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्रकाश सावंत व सतीश मोरे यांचे लाभले. गेल्यावर्षीप्रमाणे यावर्षीही शिराळे खुर्द या द्विशतकी शाळेने तालुकास्तरावर मिळविलेले सुयश निश्चितच कौतुकास्पद आहे.यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि कौतुक गटशिक्षणाधिकारी पोपटराव मलगुंडे, शिक्षण विस्ताराधिकारी बाजीराव देशमुख, जगन्नाथ पाटील, संजय पाटील, केंद्रप्रमुख रवींद्र लोंढे, लोकनियुक्त सरपंच शर्मिलाताई आंदळकर, उपसरपंच संदीप पाटील, शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष मारुती पाटील आणि सर्व सदस्यांनी केले आहे.

# सामाजिक न्याय विभागाच्या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन जल्लोषात संपन्न

नवी मुंबई : सामाजिक न्याय विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग अधिनस्त शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींचे व अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग श्री.बाळासाहेब सोळंकी यांच्या हस्ते मोठ्या जल्लोषात संपन्न झाले.

या कार्यक्रमास खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ खोपोली चे कार्यवाह श्री.किशोर पाटील, अध्यक्ष श्री संतोष जंगम, बी.एल.पाटील तंत्रनिकेतन कौन्सिल चे अध्यक्ष श्री.जितेश ठक्कर, बी.एल.पाटील तंत्रनिकेतन खोपोली चे प्राचार्य श्री.प्रशांत माने, रत्नागिरी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण श्री.दीपक घाटे, सिंधुदूर्ग सहाय्यक आयुक्त समाज कल्याण श्री.संतोष चिकने, रायगड सहाय्यक आयुक्त समाज कल्याण श्री.सुनील जाधव आदि मान्यवर उपस्थित होते.

# आयटीआय येथे उपहारगृह सुरु करण्यासाठी दरपत्रक सादर करण्याचे आवाहन

सातारा : शासकीय प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) सातारा हे अनुभवी आहार व्यवस्था ठेकेदारकडून महाराष्ट्र पध्दतीचे जेवण, चहा,कॉफी अल्पोउपहाराचे पदार्थ इत्यादी पुरवण्याचे व शासकीय किंवा खाजगी उपहारगृह चालविण्याचा अनुभव आहे. त्यांच्याकडून सिलबंद दरपत्रक २० जानेवारी २०२६ सायंकाळी ५ वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत.

अटी व सुचना कार्यालयामध्ये सुध्दा उपलब्ध होतील, संस्थेमध्ये प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता उघडण्यात येतील. सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार शासकीय प्राचार्य प्राशिक्षण संस्था, सातारा यांनी त्यांच्याकडे राखुन ठेवला आहे.

# औंध येथील आश्रमशाळेचे कार्य कौतुकास्पद आवश्यक ती सर्व मदत करणार : सोनियाताई गोरे

औंध : औंध येथील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेचे शैक्षणिक व सामाजिक कार्य अत्यंत कौतुकास्पद असून, शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ती सर्व मदत व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही कमलाबाई गोरे शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सौ. सोनियाताई गोरे यांनी दिली. शिवगर्जना प्रतिष्ठान संचलित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा तसेच स्व. संभाजीराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय येथे आयोजित इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा, पालक मेळावा, स्नेहसंमेलनाचे उद्घाटन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सौ. सोनियाताई गोरे यांच्या हस्ते पार पडला.

भाजपा जिल्हा उपाध्यक्ष विशाल बागल, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वाघमोडे, संतोष जाधव, हणमंत मदने, विठ्ठल चव्हाण, सह्याद्री देशमुख, सचिन घाडगे, रणजितसिंह देशमुख, गणेश चव्हाण, मुलाणी, संदीप इंगळे




उपस्थित होते. सौ. सोनियाताई गोरे यांनी आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या गुणवत्तेबाबत गौरवोद्गार काढत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करून स्वतः चे तसेच आपल्या कुटुंबाचे नाव उज्ज्वल करावे. आवडत्या क्षेत्राची निवड करून कठोर परिश्रमाच्या जोरावर यश संपादन करावे, असे आवाहन त्यांनी केले. ना. जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून शाळा व विद्यार्थ्यांसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी शिवगर्जना प्रतिष्ठानच्या माध्यमातून विद्यार्थी हितासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध शैक्षणिक योजना, उपक्रमांची माहिती दिली. प्रा. प्रमोद जगताप यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत गुरूंच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. रामचंद्र पवार, दिलीप जाधव, रामभाऊ येवले, अर्जुन यादव, निर्मला ताई रणदिवे, संदेश रणदिवे, जयवंत देशमुख, बाळासाहेब घार्गे, युवराज कुंभार, सोपान देशमुख, अंकुश रणदिवे, सुहास दाभाडे, महेश गोसावी, संभाजी कुंभार, ज्ञानेश्वर चौगुले, हैदर पठाण, हरिभाऊ येवले उपस्थित होता. प्रास्ताविक माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक दडस सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक चंद्रकांत जाधव यांनी केले. सूत्रसंचालन माने यांनी केले.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अंतर्गत भाऊ कदम यांची वरुडला भेट



वडूज : लोकप्रिय सिने अभिनेते तसेच हास्य कलाकार भाऊ कदम यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत खटाव तालुक्यातील वरुड येथे स्नेह भेट दिली. यावेळी त्यांनी विविध विकास कामे पाहिली आणि समाधान व्यक्त केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल देसाई, गटविकास अधिकारी योगेश कदम, सहायक गटविकास अधिकारी जयवंत दळवी, ग्रामपंचायत विस्ताराधिकारी माधव बोईनवाड तसेच सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

भाऊ कदम यांनी जलसरोवर ,घरकुल, मियावाकी जंगल, जलतरा प्रकल्प इत्यादी ठिकाणी भेट देऊन विविध उपक्रमांचे कौतुक केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज योजनेअंतर्गत विविध उपक्रम राबवले जात आहेत. श्रमदानापासून प्रबोधनापर्यंत सर्व पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. याच अंतर्गत समाजातील सेलिब्रिटींची लोकप्रियता पाहून शासनाने सेलिब्रिटींची भेट देखील आयोजित केले आहे. त्यानुसार अभियानाच्या प्रचार प्रसिद्धीसाठी सिनेअभिनेते,कॉमेडी स्टार लोकप्रिय कलाकार भाऊ कदम व त्यांची टीम वरुड येथे आली होती. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत सहभाग झालेल्या वरुड गावाने केलेल्या कामकाजाचे पाहणी करण्यासाठी तसेच अभियानाची प्रचार प्रसिद्धी करण्यासाठी नामदार जयकुमार गोरे ग्रामविकास तथा पंचायत राज मंत्री यांच्या संकल्पनेतून अभियान राबवले जात आहे. कलाकारांची लोकप्रियता पाहता समाजाशी त्यांचा मनोरंजनाच्या माध्यमातून संबंध येतो. त्यांच्याशी संवाद साधायला जनता उत्सुक असते हेच ओळखून श्री कदम यांना निमंत्रित करण्यात आले होते. संपूर्ण पाहणी नंतर भाऊ कदम यांनी ग्रामस्थांशी खुमासदार शैलीमध्ये संवाद साधला आणि वरुड गावाला या अभियानातील यश मिळण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विविध लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक गटविकास अधिकारी योगेश कदम यांनी केले. विस्ताराधिकारी यशेंद्र क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. सहाय्यक गटविकास अधिकारी जयवंत दळवी यांनी आभार मानले.

# स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण उत्साहात






कराड : शिक्षण मंडळ,कराड संचालित नूतन मराठी शाळा,कराडचे स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला.

वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रशांत लाड उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांचे व्यक्तिमत्व घडवण्यासाठी शिक्षकांनी व पालकांनी विद्यार्थ्यांना घडण्याची संधी उपलब्ध करून द्यावी असे प्रतिपादन त्यांनी आपल्या मार्गदर्शनात केले.

विविध पारितोषकांचे मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विविध गुणदर्शन कार्यक्रमात तब्बल ७५० विद्यार्थ्यांनी पथनाट्य,नाट्यछटा, विविध नृत्ये सादर केली.कार्याध्यक्षा प्रतिभा साळवेकर,उपकार्याध्यक्ष गणेश सोळंके यांनी मुख्याध्यापिका आशादेवी भुतकर यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही उपक्रमांचे उत्तम नियोजन केले.

प्रसंगी शिक्षण मंडळ ,कराडचे सहसचिव राजेंद्र लाटकर,संचालक सुधीर घाटे,मुख्याध्यापिका आशादेवी भुतकर,माजी मुख्याध्यापिका प्रभा जोशी,पूर्व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका कांचन उमराणी,सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाच्या दिनदर्शिकेचे मध्य प्रदेशात भव्य प्रकाशन



इंदौर : लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ (केंद्रीय नीती आयोग संलग्न) यांच्या वतीने सन २०२६ च्या मध्य प्रदेश आवृत्ती दिनदर्शिकेचे भव्य प्रकाशन 'दर्पणकार' आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त तसेच महाराष्ट्र पत्रकार दिनाचे औचित्य साधून इंदौर (म.प्र.) येथे मराठा प्रहार च्या कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकांत दादा कुंजीर (संस्थापक अध्यक्ष क्षत्रिय मराठा नवनिर्माण सेना), मुख्य संपादक दै. मराठा प्रहार व मराठा प्रहार न्यूज चॅनल) हे होते. प्रमुख अतिथी म्हणून समाजसेवी तथा विविध संस्थांचे पदाधिकारी सन्माननीय मिलिंदजी दिघे उपस्थित होते. तसेच सौ. स्वातीताई मोहीते, श्री धनंजय कोलार, श्री ओम नम्र, ललित जैन भंसाली,दिलीप देशमुख, आणि लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे मध्य प्रदेश राज्य प्रभारी श्री. उमेश थोरात यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

दिलीप देशमुख म्हणाले, 'दर्पणकार ' आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याचा गौरव करत मराठी पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवून समाजप्रबोधनाचे महान कार्य त्यांनी केले, याच औचित्याने मध्य प्रदेश आवृत्ती दिनदर्शिकेचे औपचारिक प्रकाशन करून उपस्थित पत्रकार, पदाधिकारी व मान्यवरांना दिनदर्शिकेचे वितरण करण्यात आले. चंद्रकांत दादा कुंजीर म्हणाले, समाजाचा आरसा म्हणून काम करणारा पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. सत्य, निर्भीडता आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांच्या आधारावर पत्रकार सतत जनतेचा आवाज बनून उभा राहतो. अन्याय, भ्रष्टाचार आणि असत्याविरुद्ध लेखणी उचलत समाजाला योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करीत असतो.यावेळी प्रमुख अतिथी समाजसेवी मिलिंदजी दिघे यांनी आपल्या भाषणातून लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाच्या २०२६ मध्य प्रदेश दिनदर्शिकेस तसेच महासंघाच्या विविध सामाजिक व पत्रकारहिताच्या उपक्रमांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. पत्रकारिता हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम असून पत्रकारांच्या सन्मान, हक्क व सामाजिक बांधिलकीसाठी महासंघ करत असलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.मध्य प्रदेश राज्य प्रभारी श्री. उमेश थोरात म्हणाले, महासंघाचे संस्थापक अध्यक्ष श्री. संजय देशमुख निंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महासंघाचे संघटनात्मक कार्य अधिक बळकट होत असून पत्रकारांच्या हक्क, सन्मान व सामाजिक बांधिलकीसाठी महासंघ सातत्याने कार्यरत असल्याचे सांगितले.

# कोठेकर योगिता यांच्या 'शिदोरी संस्काराची' पुस्तकाचे प्रकाशन




सातारा : विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांचे महत्त्व प्रभावीपणे सांगणारे 'शिदोरी संस्काराची' हे पुस्तक म्हणजे संस्कारांची समृद्ध शिदोरी ठरावी, अशा शब्दांत साहित्यिकांनी गौरवलेले श्रीम कोठेकर योगिता यांच्या चौथ्या पुस्तकाचे प्रकाशन ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मोठ्या उत्साहात पार पडले. सातारा येथे भरलेल्या संमेलनातील प्रकाशन कट्टा व कविकट्टा या मंचावर मान्यवरांच्या हस्ते हे प्रकाशन करण्यात आले.

या प्रसंगी प्रकाशन कट्टा प्रमुख घनश्याम पाटील, कविकट्टा अध्यक्ष राजन लाखे, उपशिक्षणाधिकारी रवींद्र खंदारे, कोठवळे मॅडम, सौ. कारंजकर, श्री. माडगूळकर सर, महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी-चिंचवड कार्यकारिणी सदस्य किरण लाखे व सुनीता बोडस यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थी व पालकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे आणि मूल्यांचे संवर्धन करणारे हे पुस्तक आहे.

'शिदोरी संस्काराची' या शीर्षकातूनच पुस्तकाचा आशय स्पष्ट होतो. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविताना त्यांच्या मनात मूल्यांचा ठेवा निर्माण करणारे, जीवनात योग्य वर्तन, आचार-विचारांची दिशा दाखवणारे, परिवर्तन घडवून आणणारे व सकारात्मक दृष्टिकोन वाढवणारे हे पुस्तक आहे. पुस्तकातील चारोळ्या अत्यंत समर्पक, ओघवत्या व अर्थपूर्ण शैलीत मांडण्यात आल्या असून, त्यातून निसर्ग, इतिहास, अध्यात्मिक मूल्ये, कौशल्य आणि शिक्षण यांचा सुरेख संगम अनुभवायला मिळतो.

श्रीम कोठेकर योगिता या शिवभूमी विद्यालय (प्राथमिक विभाग) येथे शिक्षिका म्हणून कार्यरत असून त्या कवयित्री, लेखिका म्हणूनही परिचित आहेत. आजवर त्यांची 'काव्ययोग', 'मनातल्या कविता', 'संस्कार शिदोरी', 'आमचे अभिमान' ही चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अध्यापनाचा प्रदीर्घ अनुभव, विविध शिक्षण परिषदा, साहित्य संमेलने व कार्यशाळांमधील सक्रिय सहभाग यामुळे त्यांच्या लेखनाला व्यापक व सखोल दृष्टिकोन लाभला आहे. विद्यार्थ्यांमध्येही त्यांनी कविता लेखनाची गोडी निर्माण केली आहे.

# आंतरराष्ट्रीय पातळीवरील 'सावित्रीबाईंचा सन्मान' चिंचवडमध्ये उत्साहात




चिंचवड : सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त अंनिस ग्रंथदिंडी व अंनिस पिंपरी-चिंचवड शाखेच्या वतीने एक अनोखा व वैचारिक दृष्ट्या समृद्ध असा 'आंतरराष्ट्रीय सावित्रीबाईंचा सन्मान' सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

प्रा.सुरेखा कटारिया, डॉ. श्वेता राठोड, अंजली देशमुख, डॉ. ज्योती शेट्टी तसेच अमेरिकेत वास्तव्यास असलेल्या दिपाली पेंडसे कुलकर्णी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. श्री. पेंडसेकाका म्हणाले, अंनिसच्या वतीने 'हुतात्मा डॉ. नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठ' स्थापन करण्यात आले असून, त्या अंतर्गत अशा प्रकारच्या वैचारिक व्याख्यानमाला यावर्षी सुरू करण्याचा मानस आहे.

अलका जाधव यांनी प्रेरणादायी परिचय करून दिला. प्रा. सुरेखा कटारिया व डॉ. श्वेता राठोड यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यकर्तृत्वाचा सखोल आढावा घेत, कालची, आजची व उद्याची सावित्रीबाई या संकल्पनेवर आधारित द्विपात्री नाट्यछटांच्या संवादातून प्रभावी सादरीकरण केले.

डॉ. श्वेता राठोड यांनी सादर केलेल्या पोवाड्याने विशेष रंगत आणली. दिपाली पेंडसे कुलकर्णी यांनी अमेरिकेत चालवत असलेल्या 'गुरुकुल माझी फुलपाखरे' या उपक्रमाची माहिती दिली.

अंजली देशमुख यांनी देहूरोड येथे गेली अनेक वर्षे चालवत असलेल्या बालवाडीच्या माध्यमातून समाजसेवा करत संसाराला हातभार लावल्याचे कार्य उपस्थितांना प्रेरणादायी वाटले. डॉ. ज्योती शेट्टी यांनी स्त्रियांच्या शिक्षणाचे सामाजिक परिवर्तनातील महत्त्व अधोरेखित केले.

सूत्रसंचालन इला पवार यांनी केले, तर आभार मिलिंद देशमुख यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बावनकर, सरोज पेंडसे, प्रदीप तासगांवकर, मनिषा चक्रे, इंद्रजित तसेच अंनिसच्या सर्व कार्यकर्त्यांचे योगदान लक्षणीय ठरले.

# ‘रयत’ च्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये तनुष्का देसाईचे उज्ज्वल यश

## खळेत न्यू इंग्लिश स्कूल व ग्रामस्थांतर्फे सत्कार

ढेबेवाडी : रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागाच्यावतीने कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत घेतलेल्या वक्तृत्व स्पर्धेत खळे (ता.पाटण) येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील नववीची विद्यार्थिनी तनुष्का गणेश देसाई हिने उज्ज्वल यश संपादन केले.

धनंजयराव गाडगीळ महाविद्यालयात घेण्यात आलेल्या स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत तनुष्काने प्रभावी वक्तृत्वशैली व स्पष्ट विचारमांडणीने आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण



केले.

यशाबद्दल कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.ज्ञानदेव मस्के,सहसचिव डॉ.शिवलिंग मेनकुदळे,सहाय्यक विभागीय अधिकारी दिनेश दाभाडे यांच्या हस्ते तिला बक्षीस देवून गौरविण्यात आले. शाळेच्या वतीनेही प्रभारी मुख्याध्यापक कांबळे यांनी तिचा सत्कार केला.

उपस्थित विद्यार्थी, स्थानिक स्कूल कमिटीचे पदाधिकारी,शिक्षक, कर्मचारी आदींनीही याप्रसंगी तिचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. तनुष्काला शिक्षिका पल्लवी निकम - पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.तनुष्काच्या यशामुळे न्यू इंग्लिश स्कूलच्या शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील उज्ज्वल परंपरेत भर पडल्याचे मुख्याध्यापक कांबळे यांनी सांगितले.

# ‘सावली’ तर्फे कराड जेष्ठ नागरिकांचा मेळावा

ढेबेवाडी : येथील सावली जेष्ठ नागरिक सामाजिक संस्थेच्या वतीने शनिवारी (ता.१०) कराड येथे ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा आयोजित केल्याची माहिती ट्रस्टचे सचिव प्रा.डॉ अशोक पाटील यांनी दिली. ते म्हणाले,'ज्येष्ठांची संख्या वेगाने वाढत आहे. आता साधारणपणे दहा टक्के असणारा त्यांचा आकडा पुढच्या २५ वर्षात दुप्पट होईल असे सांगितले जात आहे.

जेष्ठ नागरीकांचे हक्क,सरकारी धोरण, कायदा,आरोग्य विषयक जागरूकता,मनोरंजन आदी गोष्टी डोळ्यासमोर ठेवून सावली जेष्ठ नागरिक संस्थेने कऱ्हाडला जेष्ठ नागरिकांचा मेळावा आयोजित केला आहे. शनिवारी सकाळी नऊ ते सायंकाळी चार या वेळेत (कै) सौ वेणूताई चव्हाण स्मारक केंद्र कराड येथे मेळावा होईल.सकाळी नऊ ते दहा नोंदणी, दहा ते ११ पोलिस उपअधीक्षक राजश्री पाटील यांच्या हस्ते व डॉ .सुभाष एरम यांच्या अध्यक्षतेखाली उदघाटन होईल. सकाळी ११ते १२ जेष्ठ नागरीकांचे हक्क,जेष्ठ नागरिक धोरण व कायदा या विषयावर ड प्रमोद ढोकळे, दुपारी बारा वाजता प्रा.डॉ अशोक पाटील यांचे ज्येष्ठांचे मानसिक आरोग्य,दुपारी दोन वाजता डॉ सनद पवार यांचे 'आव्हान डिमेंशियाचे ' या विषयावर व्याख्यान होईल.दुपारी तीन वाजता ऋचिका खोत यांचा ' बांधारीचे बाई ग' हा मनोरंजनात्मक कार्यक्रम होईल. या मेळाव्यासाठी पूर्व नोंदणी आवश्यक आहे.आधिक माहितीसाठी ७५८८६८३५१३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन प्रा.डॉ.पाटील यांनी केले आहे.

**शनिवारी विविध विषयावर तज्ञांचे मार्गदर्शन**

# रोटरी क्लब मलकापूरकडून गरजूंना नवीन कपड्यांचे वाटप

मलकापूर : सामाजिक बांधिलकी जपत रोटरी क्लब मलकापूरच्या वतीने जखिणवाडी (मलकापूर-कराड) येथे सुमारे २०० गरजू महिला व पुरुषांना नवीन व उपयोगी कपड्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

थंडीच्या दिवसांत गरजू घटकांना आधार देणारा हा उपक्रम परिसरात विशेष कौतुकाचा विषय ठरला. ग्रामीण व वंचित घटकांपर्यंत मदत पोहोचविण्याच्या उद्देशाने



राबविण्यात आलेल्या या कुटुंबांना मोठा दिलासा उपक्रमामुळे अनेक गरजू मिळाला.कपड्यांचे वाटप अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले असून महिलां, पुरुषांबरोबरच ज्येष्ठ नागरिकांनीही या उपक्रमाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमाला रोटरी क्लब मलकापूरचे अध्यक्ष राहुल जामदार, सचिव विजय दुर्गावळे, प्रोजेक्ट चेअरमन सलीम मुजावर यांच्यासह भगवानराव मुळीक, विजया माने, संजय बडदरे व इतर रोटरी पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**समाजातील गरजू घटकांच्या गरजा ओळखून मदतीचा हात देणे हेच रोटरीचे खरे उद्दिष्ट आहे. अशा उपक्रमांमुळे सामाजिक एकात्मता वाढते आणि माणुसकीचे नाते अधिक दृढ होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रोटरी क्लब मलकापूरच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमाबद्दल स्थानिक नागरिकांनी रोटरी क्लबचे आभार मानले.**

# सातारा जिल्ह्याला निर्भीड पत्रकारितेची मोठी परंपरा : पालकमंत्री शंभूराज देसाई

सातारा : सातारा जिल्ह्याला निर्भीड पत्रकारितेची फार मोठी परंपरा आहे. चांगल्या गोष्टींसाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन यांना भक्कम पाठींबा देण्णारी आहे. यापूढेही माध्यमांच्या प्रतिनिधींनी लोकहिताची कामे करताना सहकार्य करावे. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि माध्यमे यांनी साताऱ्याच्या उज्वल विकासासाठी हातात हात घालून एकत्र काम करुया, असे प्रतिपादन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले.



पत्रकार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशासनाच्यावतीने पत्रकारांसाठी, सर्व माध्यमांतील प्रतिनिधींसाठी चहापान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी खासदार नितीन पाटील, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्यासह संपादक, वरिष्ठ पत्रकार, इलेक्ट्रानिक मिडीयाचे प्रतिनिधी, समाज माध्यमांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१ ते ४ जानेवरी या कालावधीत सातारा येथे झालेल्या ९९व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या यशस्वी आयोजनात महत्त्वापूर्ण भूमिका बजावलेल्याबद्दल संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. साताऱ्याला निर्भिड पत्रकारीतेचा वारसा असल्याचे सांगून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, या आधीच्या पिढीतील अनेक दिग्गज पत्रकारांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये पत्रकारीता केली. लोकहितकारी उपक्रमांना भरु भरुन पाठींबा देत असतानाच जिथे चुका व त्रूटी आढळलेल्या त्यावर कठोरपणे प्रहार करुन डोळ्यात अंजन घालण्याचे कामही त्यांनी केले. समाजातील अनिष्ठ प्रथा, समस्या यावर प्रकाश टाकून लोकांना जागरुक करण्याचे काम पत्रकारितेने केल्याचे सांगून पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी सदैव कटीबध्द राहू अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली. नुकतेच झालेले ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अत्यंत यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल संयोजक, कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, प्रशासकीय यंत्रणा यांचे त्यांनी मन:पूर्वक अभिनंदन केले.

खासदार नितीन पाटील यांनी यावेळी पत्रकार, माध्यम प्रतिनिधींना पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. जिल्हाधिकारी श्री. संतोष पाटील म्हणाले, जे चांगले त्याला प्रसिध्दी देण्याचे आणि जिथे त्रूटी आढळल्या त्या निर्दशनास आणून देण्याचे कार्य साताऱ्यातील वृत्तपत्रे व मिडीया अव्याहतपणे करत आले आहेत. साताऱ्यातील वृत्तपत्रांनी आणि माध्यमांनी सकारात्मक पत्रकारितेचे व लोकहितासाठी अखंडपणे लढण्याचे व्रत कायमपणे जोपासले आहे. सरकार आणि जनता यांच्यामधील दुवा जपत असतानाच जनतेला माहिती देणे आणि कोणतीही माहिती सत्य व वस्तूनिष्ठ स्वरुपात मांडणे असा येथील पत्रकारितेचा अनुभव आपण घेत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी ३२ वर्षांनंतर साताऱ्यात झालेले ९९ वे अखिल भारतीय संमेलन यशस्वी करण्यामध्ये माध्यमांची भूमिका महत्वपूर्ण राहीली आहे. कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी हे वरिष्ठ पत्रकार असून हे साहित्य संमेलन साताऱ्यात आणण्यात आणि चार दिवसांचे साहित्य संमेलन अनेक नवीन मापदंडांसह निर्माण करत यशस्वी करण्यात त्यांच्या बजावलेल्या भूमिकेचा अभिमान असल्याबाबत गौरवपूर्ण उद्गार काढले. यावेळी विनोद कुलकर्णी यांचा पालकमंत्री यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना विनोद कुलकर्णी यांनी प्रशासनाने या साहित्य संमेलनाला यशस्वी करण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. याबद्दल प्रशासनाचे व सर्वच घटकांचे आभार व्यक्त केले.

# पालकमंत्री आपल्या दारी उपक्रमांतर्गत प्राप्त अर्जावर गतीने निपटारा करा-पालकमंत्री शंभूराज देसाई

सातारा : पालकमंत्री आपल्या दारी उपक्रमांतर्गत प्राप्त अर्जांवर कार्यवाही सुरु झालेली आहे. ही समाधानाची बाब आहे. पण जोपर्यंत अर्जदाराचे काम पूर्ण होत नाही तो पर्यंत यंत्रणेचे काम संपत नाही. लोकांना वेळेत न्याय मिळणे, त्यांची कामे सकारात्मक पद्धतीने मार्गी लागणे ही बाबत आवश्यक आहे. पालकमंत्री आपल्या दारी हा उपक्रम याच दृष्टीने महत्वाचा आहे. प्रत्येक विभागाने त्यांच्याशी संबंधित अर्जांचा गतीने निपटारा होईल याबाबत अत्यंत दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री कार्यालय आपल्या दारी या उपक्रमाचा आढावा पालकमंत्री श्री. देसाई यांनी घेतला. या आढावा बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अभय काटकर, जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने, पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसीलदार अनंत गुरव, कराडच्या तहसीलदार कल्पना ढवळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कोणत्याही स्थितीत यंत्रणांनी नागरिकांची कामे रखडवणे, विलंब करणे, नकारात्मक प्रतिसाद देणे, लोकांना हेलपाटे मारावयाला लावणे या पद्धतीचा प्रतिसाद खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा देऊन पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, पालकमंत्री कार्यालय आपले दारी या उपक्रमांतर्गत १ सप्टेंबर ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत ४ हजार ८१९ अर्ज प्राप्त झाले असून २ हजार ४०६ अर्जांवर कार्यवाही सुरु आहे. ७२० अर्जांवर कार्यवाही पूर्ण तर अद्याप १ हजार ४९९ अर्जांवर कार्यवाही पूर्ण झालेली नाही या अर्जांवर तातडीने सामाजिक भावनेतून निर्णय घ्यावा, असेही निर्देश दिले.

पालकमंत्री कार्यालयाकडे नवीन शिधापत्रिकेसाठी मागणी होत आहे. मागणीनुसार नागरिकांना शिधापत्रिका देण्याची कार्यवाही करावी. पीएम किसान, नमो शेतकरी योजने कृषी विभागाने नवीन शेतकऱ्यांची नोंदणी करुन केंद्र व राज्य शासनाचा लाभ मिळेल या दृष्टीने काम करावे. मुख्यमंत्री लाडकी बहिण शासनाची महत्वकांक्षी योजना आहे.

पाटण तालुक्यातील या योजनेच्या महिला लाभार्थ्यांना पैसे मिळणे बंद झाले आहे. या महिलांना योजनेंतर्गत पैसे मिळावे यासाठी जिल्हा महिला व बाल विभागाने मंत्रालयस्तरावर पाठपुरावा करावा, असे निर्देश देऊन पाटण तालुकास्तरावरील प्रलंबीत अर्जांचा श्री. टोम्पे यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा तसेच जिल्हास्तरावरील अर्जांचा आढावा घेण्यासाठी उपजिल्हाधिकारी पदाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, असे ही पालकमंत्री श्री. देसाई यांनी सांगितले.

# ‘कृष्णा’च्या महिला शेतकरी ऊस शेती ज्ञानलक्ष्मी प्रशिक्षणासाठी रवाना




शिवनगर : वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्यावतीने ऊस शेती ज्ञानलक्ष्मी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. चार दिवसीय शिबीरासाठी य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या १२ महिला शेतकरी रवाना झाल्या असून, त्यांना अत्याधुनिक ऊसशेतीचे धडे गिरविण्याची संधी मिळणार आहे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटतर्फे शेतकर्यांना दरवर्षी ऊसशेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, ऊसाच्या प्रतिएकरी उत्पादनवाढीसाठी प्रशिक्षण दिले जाते. कृष्णा कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखालील संचालक मंडळाने कार्यक्षेत्रातील महिला शेतकर्यांना या शिबीरात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

पुणे येथे आयोजित शिबीरासाठी रवाना झालेल्या महिला शेतकऱ्यांना संचालक बाबासो शिंदे, विलास भंडारे, मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार, मनोज पाटील, जनरल मॅनेजर केन दादासाहेब शेळके, ऊसविकास अधिकारी पंकज पाटील यांच्यासह सर्व खातेप्रमुख यांनी शुभेच्छा दिल्या. शिबीरात ऊस शेतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली वापर, माती परीक्षण, अधिक ऊस उत्पादनासाठी खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, खोडवा व्यवस्थापन, ऊती संवर्धित रोपे, बियाणे मळा, रोग व कीड नियंत्रण व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, जैविक खतांचा वापर आदी विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

# ट्रान्सफॉर्मर जळाल्याने पिके लागली करपू

## वडूज वीज कंपनीच्या अधिकाऱ्याचे दुर्लक्ष

**(जय लोहोरा)**

पुसेसावळी : खटाव तालुक्यातील चोराडे येथील कुरण मळ्यातील डिशनल गुदगे डी.पी गेल्या पंधरा दिवसापूर्वी जळाल्यामुळे येथील शेतकऱ्यांसह जनावरांचे हाल सुरू आहेत.त्यातच वडुज येथील वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे हातातोंडाला आलेली पिके पाण्या अभावी जळू लागली आहेत.

त्यामुळे दोन दिवसात ट्रान्स्फॉर्मर न बसविल्यास घंटानाद आंदोलन पुसेसावळी विज कंपनी समोर करण्यात येणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. ट्रान्सफॉर्मर जळाला असल्याची माहिती पुसेसावळी येथील वीज वितरण कंपनीचे अधिकारी व वायरमन यांना दिली होती. तरीसुद्धा महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी वडूज येथील अधिकाऱ्यांकडून अजूनपर्यंत डीपी बसविण्यात आलेली नाही. त्यामुळे पिकांना वेळेत पाणी न मिळाल्यामुळे ऊस उगवण क्षमतेवर परिणाम झाला आहे. शाळू, हरभरा, मका, ऊस ही पिके पाण्याअभावी जळू लागली आहेत. त्यामुळे हातातोंडाशी आलेल्या पिकांचे नुकसान



होत असल्याने शेतकरी हतबल झाला आहे.

तरी वडूजमधील वीज अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता, उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. तर कधी संबंधित अधिकारी फोन उचलत नाहीत,त्यामुळे हाता तोंडाशी आलेली पिके वाळू लागल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून याला सर्वस्वी वीज वितरणचे अधिकारी जबाबदार आहेत. अशी भावना शेतकरी वर्गाकडून बोलली जात आहे.

# लाहोटी कन्या प्रशालेत स्फूर्ती पुरस्कार व वार्षिक पारितोषिक वितरण

कराड : शिक्षण मंडळ ,कराड संचालित स्व.शेठ रामबिलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशालेत आदर्श माजी विद्यार्थिनीस प्रदान केला जाणारा स्फूर्ती पुरस्कार भाग्यश्री अभय प्रभुणे -कुलकर्णी यांना शिक्षण मंडळ ,कराडचे अध्यक्ष डॉ.अनिल हुद्देदार यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

सत्कारास उत्तर देताना भाग्यश्री प्रभुनी कुलकर्णी म्हणाल्या, शाळा माऊलींनी दिलेला पुरस्कार इतर पुरस्कारापेक्षा खूपच प्रेरणादायी आहे ,विद्यार्थिनींनी शालेय जीवन आनंदाने जगावे ,खूप खेळावे,नाचावे बागडावे आणि भरपूर वाचन करावे.प्रसंगी त्यांनी मनोरुग्ण पुनर्वसन कार्यातील त्यांचे अनुभव कथन त्यांनी केले.

डॉ.अनिल हुद्देदार म्हणाले,भाग्यश्री प्रभुणे- कुलकर्णी यांचे सामाजिक कार्य खूप मोठे आहे,रस्त्यावर फिरणाऱ्या राज्य व परराज्यातील ३००० पेक्षा जास्त मनोरुग्णांना शास्त्रीय मानसोपचार ,आसरा मायेची ऊब व मदतीचा हात देऊन पुनर्वसन केले, प्रत्येक रचनात्मक कार्यामागे स्त्री शक्तीचा सिंहाचा वाटा आहे ,त्यांच्या मानवतावादी कार्याच्या पाठीमागे शिक्षण मंडळ,कराड सदैव उभे राहील.प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते वार्षिक पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापिका हेमलता जंगम यांनी केले. कार्याध्यक्षा मीनल भोसले यांनी प्रमुख अतिथी व त्यांच्या कार्याचा परिचय करून दिला.पारितोषिक प्राप्त विद्यार्थिनींच्या यादीचे वाचन संगीता माळी यांनी केले. आभार अमृत गिजरे याने मानले तर सूत्रंचालन अनिल थोरात यांनी केले. अरविंद घाटे,उपमुख्याध्यापिका छाया कुंभार,पर्यवेक्षिका सुनिता अवघडे, पर्यवेक्षक जगदीश कुंभार उपस्थित होते.

